जनसंपर्क कक्ष

19 DEC 2023 पुढारी. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ६० व्या दीक्षान्त समारंभात 'राष्ट्रपतींचे सुवर्णपदक' साईसिमरन घाशी, तर 'कुलपती सुवर्णपदक' बिल्कीस गवंडी हिला प्रदान करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, अखिल भारतीय तंत्रशिक्षण मंडळाचे माजी अध्यक्ष डॉ. एस. एस. मंथा. सोबत प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव. (वृत्त / पान ५)

# शिक्षणातच परिवर्तन घडविण्याचे सामर्थ्य

## डॉ. एस. एस. मंथा; शिवाजी विद्यापीठाचा ६० दीक्षांत समारंभ उत्साहात

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

परिवर्तन घडविण्याचे सामर्थ्य शिक्षणात आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांची प्रत्येक कृती परिवर्तनाला हातभार लावणारी असली पाहिजे. आयुष्यात मोठी ध्येये व स्वप्ने पाहा. अपयशाला स्वीकारा, त्यातून शिका, यशाची नवीन शिखरे गाठा. समाजामध्ये विद्यापीठाची प्रतिमा तयार करण्यासाठी राजदूत बनून योगदान द्यावे, असे प्रतिपादन अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेचे माजी अध्यक्ष डॉ. एस. एस. मंथा यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचा ६० वा हीरकमहोत्सवी दीक्षांत समारंभ सोमवारी राजमाता जिजाऊसाहेब बहुद्देशीय सभागृहात झाला. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. एम.ए. मास कॉम अधिविभागाची विद्यार्थिनी साईसिमरन घाशी हिला राष्ट्रपती सुवर्णपदक, तर जयसिंगपूर कॉलेज, जयसिंगपूरची विद्यार्थिनी बिल्कीस गवंडी हिला कुलपती सुवर्णपदक प्रदान करण्यात आले. यासह ४७ पीएच.डी. पदव्या आणि १८ पारितोषिके प्रदान करण्यात आली.

डॉ. मंथा म्हणाले, यूएस, यूके, जर्मनी व इतर समकक्ष देश विद्यापीठांचे रँकिंग सुधारण्यासाठी दीर्घकालीन व सातत्यपूर्ण प्रयत्न करीत आहेत. बदलत्या शैक्षणिक परिस्थितीशी जुळवून घेण्याची क्षमता देशातील विद्यापीठांनी विकसित करावी.

### राज्यपालांचा दौरा रद्द

शिवाजी विद्यापीठ दीक्षांत समारंभानिमित्त राज्यपाल रमेश बैस प्रथमच कोल्हापूर दौऱ्यावर येणार होते. या दौऱ्यात ते अंबाबाई दर्शनासह विविध कार्यक्रमास उपस्थित राहणार होते. मात्र रविवारी मध्यरात्रीनंतर त्यांचा दौरा रद्द झाल्याचे राजभवनातून जिल्हा प्रशासनास कळविण्यात आले. सकाळी तसे अधिकृतपणे प्रशासनाकडून कळविण्यात आले. राज्यपाल यांच्या दौऱ्याची विद्यार्थ्यांमध्ये उत्सुकता होती. दौरा रद्द झाल्याने पोलिस प्रशासनावरील ताण कमी झाला.

### डिजिटल शिक्षण नवीन प्लॅटफॉर्म तयार करा

प्रत्येक उत्तम विद्यापीठाची स्वतःची विशिष्ट शक्तिस्थळे, विशिष्ट दृष्टिकोन असतात. शैक्षणिक उत्कृष्टता, संशोधन व नावीन्य, जागतिक प्रतिष्ठा, वैविध्यपूर्ण आणि प्रतिभावान विद्यार्थी, माजी विद्यार्थ्यांचे मजबूत जाळे ही वैशिष्टे आहेत. जीडीपीच्या १.४ टक्के खर्च उच्च शिक्षणावर केला जातो. अशा स्थितीत विद्यापीठांनी तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याबरोबरच डिजिटल शिक्षण अभ्यासक्रमातील नवीन प्लॅटफॉर्म तयार करून शैक्षणिक प्रगती साधावी, असे डॉ. मंथा यांनी सांगितले.

विद्यापीठांनी सक्रियपणे विद्यार्थी उद्योजकतेला समर्थन देणारे वातावरण जोपासावे. स्टार्टअप्स यशस्वीपणे पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांमुळेच विद्यापीठे नावीन्यपूर्ण, व्यावहारिक कौशल्य विकासाला चालना देणारी ठरतील. नवीन वस्तू किंवा नवीन पद्धत बनवणे म्हणजे नवनिर्मिती नाही. त्यासाठी वेगळी मानसिकता असायला हवी. जी सतत सुधारण्याचा, वातावरणाशी जुळवून घेण्याचा आणि सकारात्मक बदल घडवण्याचा प्रयत्न करत राहील. ही प्रक्रिया आत्मसात कशी करावी, हे ऋग्वेदात सांगितल्याचे ते म्हणाले.

डॉ. मंथा म्हणाले, विविध पार्श्वभूमी असलेल्या, विविध विषयांवर काम करणाऱ्या व्यक्ती जेव्हा एकत्र येतात, तेव्हा क्रांतिकारी कल्पनांचा उदय होतो. विविध दृष्टिकोन स्वीकारण्याच्या क्षमतेमुळेच प्रगती होते. ॲलन मस्क सुरुवातीच्या काळात संघर्षशील उद्योजक होते. त्यांनी दूरदृष्टी ठेवून अंतराळ संशोधनात काही तरी मोठे करण्याचे धाडस दाखवले. त्यामुळे तो जगातील मोठ्या श्रीमंतांच्या यादीत आहे.

ज्ञानाची 'अपराविद्या' व 'पराविद्या' ही दोन रूपे आहेत. येणाऱ्या आव्हानांसाठी विद्यार्थ्यांनी तयार असले पाहिजे. केवळ पदवी मिळवण्याशी संबंधित राहू नये. चांगला दृष्टिकोन व व्यापक उद्देश ठेवून कार्य केल्यास इतरांपेक्षा गर्दीत वेगळे दिसाल. स्वप्ने पाहण्याचे, ती सत्यात उतरवण्याचे आणि भविष्य घडविण्याचे ध्येय डोळ्यांसमोर ठेवून विद्यार्थ्यांनी मार्गक्रमण करावे. परिवर्तन घडविण्याचे सामर्थ्य शिक्षणात आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांची प्रत्येक कृती परिवर्तनाला हातभार लावणारी असेल, असेही ते म्हणाले.

अध्यक्षीय मनोगतात कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, स्पर्धेचे नवीन जग वेगवान आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना पदवीबरोबर तंत्रकौशल्ये विकसित करावी लागतील. प्रत्येकाचा शैक्षणिक प्रवास सारखा नसतो. संघर्ष व खडतर प्रवासातून पोहोचल्यावरच यशाला वेगळी किनार येते. विद्यार्थ्यांनी उच्च ध्येय ठेवून निष्ठेने प्रामाणिक प्रयत्न केल्यास यश मिळेल. विद्यार्थ्यांनी ज्ञानी व शहाणे व्हावे, असेही ते म्हणाले. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी वार्षिक अहवाल सादर केला. परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी पदवी, प्रमाणपत्रे व पदविकांची माहिती सादर केली. नंदिनी पाटील, धैर्यशील यादव यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले. यावेळी शाहू महाराज, ज्येष्ठ नेते व्यंकाप्पा भोसले, प्रा. किसन कुराडे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**लोकमत**








शिवाजी विद्यापीठाचा ६० वा दीक्षांत समारंभ सोमवारी उत्साहात पार पडला. पहिल्या छायाचित्रात मुख्य इमारतीसमोर छत्रपती शिवाजी महाराज वर्तुळ उद्यानामध्ये मैत्रिणींनी पदवीसमवेत सेल्फी काढून घेतली. दुसऱ्या छायाचित्रात मुख्य प्रवेशद्वारापासून राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहापर्यंत हाती मानदंड घेऊन डॉ. अजितसिंह जाधव यांच्या नेतृत्वाखाली दीक्षान्त मिरवणूक काढण्यात आली. यामध्ये डॉ. एस. एस. मंथा, डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. प्रमोद पाटील, डॉ. व्ही. एन. शिंदे, सिनेट सदस्य, व्यवस्थापन परिषद सदस्य, डीन, प्राध्यापक सहभागी झाले होते. तर तिसऱ्या छायाचित्रात दीक्षान्त समारंभात डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते साईसिमरन हिदायत घाशी हिला राष्ट्रपती सुवर्णपदक, तर बिल्कीस हिदायत गवंडी हिला कुलपती सुवर्णपदक प्रदान करण्यात आले. (सर्व छाया : आदित्य वेल्हाळ)

19 DEC 2023

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यार्थी उद्योजकतेला समर्थन देणारे वातावरण जोपासा

## एस. एस. मंथा : शिवाजी विद्यापीठाचा ६० वा दीक्षांत समारंभ उत्साहात

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : ज्या विद्यापीठातील विद्यार्थी स्टार्टअप्स यशस्वी करतात, ती विद्यापीठे नावीन्यपूर्ण व व्यावहारिक कौशल्य विकासाला चालना देतात, असे समाजात मानले जाते. त्यामुळे विद्यापीठांनी विद्यार्थी उद्योजकतेला समर्थन देणारे वातावरण जोपासले पाहिजे, असा कानमंत्र अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेचे माजी अध्यक्ष, महाप्रित स्टार्टअप सेंटरचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. एस. एस. मंथा यांनी सोमवारी दिला.



शिवाजी विद्यापीठाचा ६०वा दीक्षांत समारंभ राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात झाला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते.

डॉ. मंथा म्हणाले, आयुष्यात मोठे ध्येय ठेवा. मोठे स्वप्न पहा. यश आणि अपयश हा आपल्या प्रवासाचा भाग आहे. त्यामुळे दोघांनाही स्वीकारायची मनाची तयारी ठेवा. विद्यापीठांनी सक्रियपणे विद्यार्थी उद्योजकतेला समर्थन देणारे वातावरण जोपासले पाहिजे. यामध्ये इनक्युबेटर, फंडिंगची सोय आणि मेंटोरशीपचे कार्यक्रम यांचा समावेश असायला हवा.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, नवे जग वेगवान आणि स्पर्धेचे आहे. ही स्पर्धा जिंकण्यासाठी विद्यार्थ्यांना पदवीबरोबरच नवे तंत्र, कौशल्य आत्मसात करणे आवश्यक आहे. प्रत्येकाचा शैक्षणिक प्रवास सारखा नसतो. अनेकांना अडथळे, संघर्ष करून इथंपर्यंत पोहोचावे लागले. त्यामुळे या यशाला वेगळी किनार आहे. जीवनात अविचल निष्ठा ठेवून कार्यमग्न राहा. विद्यापीठाच्या लौकिकात आपण भर घालाल. 'ज्ञानी व्हा, शहाणे व्हा' हा पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांचा मंत्र आपण आत्मसात करावा.

प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी वार्षिक अहवाल मांडला. परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी विद्याशाखांचा आढावा घेतला.

यावेळी शाहू छत्रपती यांच्यासह सिनेट, व्यवस्थापन परिषद, शैक्षणिक परिषद यांच्यासह विभागप्रमुख, प्राध्यापक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. नंदिनी पाटील यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले. दीक्षांत समारंभामध्ये व्यासपीठावर १६ स्नातकांना पारितोषिके आणि ४० विद्यार्थ्यांना पीएच. डी. पदवी प्रदान करण्यात आली.

### लवचिकतेची भावना ठेवा

समाजामध्ये एखाद्या विद्यापीठाची प्रतिमा तेव्हाच तयार होते, जेव्हा तुमच्यासारखे विद्यार्थी त्या विद्यापीठाचे राजदूत बनतात. नाविन्य, लवचिकता आणि उद्देशाची भावना मनात ठेवून यापुढील मार्गक्रमण करा. स्वप्ने पाहण्याचे, ती सत्यात उतरविण्याचे आणि तुमचे भविष्य घडविण्याचे ध्येय डोळ्यासमोर ठेवा, असे आवाहन डॉ. मंथा यांनी विद्यार्थ्यांना केले.

### घाशी, गवंडी यांचा सुवर्णपदकाने सन्मान

या समारंभात विद्यापीठाच्या मास कम्युनिकेशन विभागाची विद्यार्थिनी साईसिमरन हिदायत घाशी (रा. बत्तीस शिराळा, जि. सांगली)ला राष्ट्रपती सुवर्णपदक, तर जयसिंगपूर कॉलेजची विद्यार्थिनी बिल्कीस हिदायत गवंडी (मूळ गाव : आगर, ता. शिरोळ) हिला एम.ए.च्या हिंदी विषयात सर्वाधिक गुण मिळविल्याबद्दल कुलपती सुवर्णपदकाने सन्मानित करण्यात आले. यंदा विद्यापीठातर्फे ४९ हजार ४३८ विद्यार्थ्यांना पदवी दिली आहे. यामध्ये ३९ हजार ८३३ जणांना पोस्टाद्वारे पदवी प्रमाणपत्र देण्यात येईल.

### आर. आर. पाटील यांनी घेतली पदवी



दीक्षान्त समारंभात करवीरचे माजी पोलिस उपअधीक्षक आर. आर. पाटील यांनी विधी पदवी घेतली. शाहूवाडीचे पोलिस उपअधीक्षक सूर्यवंशी तसेच बंदोबस्तातील असलेल्या पोलिसांनी त्यांचे अभिनंदन केले.

### हजारो पुस्तकांची विक्री

शिवाजी विद्यापीठाच्या आमराई परिसरात सुरु असलेल्या ग्रंथमहोत्सवाला तीन दिवसांत हजारो वाचकांनी भेट दिली. दीक्षांत समारंभापूर्वी आणि नंतर दिवसभरात हजारो पुस्तकांची विक्री झाल्याची प्रतिक्रिया ग्रंथ विक्रेत्यांनी दिली. या महोत्सवात विविध विषयांवरील पुस्तके उपलब्ध होती. या महोत्सवात स्थानिक प्रकाशकांसह राज्यभरातील २२ विक्रेते सहभागी झाले होते. याशिवाय दिव्यांगांनी बनविलेल्या वस्तूंच्या विक्रीचा हँडी हेल्प या संस्थेचा स्टॉल, अन्नपदार्थ विक्रीचे सात स्टॉल्स येथे आहेत. एम.बी.ए. अधिविभागाच्या विद्यार्थी-विद्यार्थिनींचेही ३, शिवाजी विद्यापीठाचा दुर्मीळ ग्रंथांचा स्टॉल, वेस्ट वेल्थ स्टार्टअप, संचालक प्रा. डी. के. मोरे यांच्या मार्गदर्शनाखालील दूरशिक्षण ऑनलाइन शिक्षण केंद्राच्याही स्टॉलवर विद्यार्थ्यांनी माहिती घेण्यासाठी गर्दी केली होती.

### बापलेकाने एकत्रित घेतली पदवी



छत्रपती शिवाजी महाराज वर्तुळ उद्यानामध्ये दीक्षान्त समारंभात श्रीकांत काळाई व पुष्कर काळाई या बापलेकांनी एकत्रित पदवी घेतल्याचा आनंद साजरा केला.

19 DEC 2023

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सर्वांगिण विकासासाठी 'स्टार्टअप'कडे वळा

## डॉ. एस. एस. मंथा यांचे विद्यार्थ्यांना आवाहन : शिवाजी विद्यापीठाचा ६० वा दीक्षांत समारंभ उत्साहात

प्रतिनिधी
कोल्हापूर

ज्या विद्यापीठातील विद्यार्थ्यांना स्टार्टअपचा ध्यास असतो व ते यशस्वी करतात ती विद्यापीठे खऱ्या अर्थाने विकासाला चालना देतात असे मत अखिल भारतीय तंत्रज्ञान परिषदेचे माजी अध्यक्ष डॉ. एस. एस. मंथा यांनी व्यक्त केले. उद्योजकाला गती मिळेल अस वातावरण विद्यापीठाने निर्माण केले पाहिजे. इनक्यूबेटर, फंडिंगची सोय आणि मेंटोरशीपच्या कार्यक्रमाचा समावेश असायला हवा असेही त्यांनी सांगितले.

शिवाजी विद्यापीठाचा ६० वा दीक्षांत समारंभ राजमाता जिजाऊ साहेब सभागृहात पार पडला. या समारंभाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. दीक्षांत समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. मंथा बोलत होते. कुलगुरूंच्या हस्ते साईसिमरन घाशीस राष्ट्रपती सुवर्णपदक तर बिल्कीस गवंडीस कुलपती सुवर्णपदक प्रदान केले. ४० पीएच. डी. व विविध अधिविभागातील १६ गुणवंत विद्यार्थ्यांना पारितोषिक देऊन गौरवण्यात आले. प्र-कुलगुरू डॉ.पी. एस. पाटील यांनी अहवाल वाचनात नॅक मूल्यांकन, एनआयआर मानांकनासह विद्यापीठाची यशस्वी घोडदौड कशी वाढत गेली याचा आढावा घेतला. यंदा ४९ हजार ४३८ विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्राचे वाटप केल्याचे सांगितले. दीक्षांत समारंभाचे लाईव्ह प्रक्षेपण करण्यात आले.




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ६० व्या दीक्षांत समारंभात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते राष्ट्रपती सुवर्णपदक स्वीकारताना साईसिमरन घाशी, कुलपती सुवर्णपदक स्वीकारताना बिल्कीस गवंडी. सोबत कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, अखिल भारतीय तंत्रज्ञान परिषदेचे माजी अध्यक्ष डॉ. एस. एस. मंथा, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, परीक्षा संचालक डॉ. अजितसिंह जाधव. दुसऱ्या छायाचित्रात मार्गदर्शन करताना डॉ. एस. एस. मंथा.

डॉ. मंथा म्हणाले, आयुष्यातील प्रत्येक गोष्ट विश्वास आणि समर्पणाच्या भावनेने केली पाहिजे. कारण विविध विषयावर काम करणाऱ्या विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन क्रांतिकारी कल्पनांचा उदय होतो. त्यामुळे मोठे ध्येय गाठण्यासाठी विविध दृष्टीकोन स्वीकारत प्रगतीचे शिखर गाठले पाहिजे. तसेच यश आणि अपयश पचवण्याची ताकद असेल तर आयुष्याचा प्रवास सुखकर होतो. विद्यापीठाची स्वत:ची शक्तीस्थळ आणि विशिष्ट दृष्टीकोन असतो. शैक्षणिक उत्कृष्टता, संशोधन, नाविन्य आणि प्रतिभावान विद्यार्थी विद्यापीठ भजबूत करतात. विद्यापीठांची उद्योग क्षेत्राशी भागीदारीही फायदेशीर ठरते. विद्यापीठात प्रमाणपत्र घेतले तरी तुमच्या ज्ञानाचा फायदा समाजाला करून दिला पाहिजे. विद्यार्थ्यांनी आपल्या कर्तृत्वाने विद्यापीठाचा लौकिक वाढवला पाहिजे.

अध्यक्षस्थानावरून कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, स्पर्धेच्या युगात टिकण्यासाठी विविध प्रकारची कौशल्य प्राप्त करावी. शैक्षणिक प्रवास पूर्ण करताना अनेकांना संघर्ष करावा लागतो. त्यामुळे विद्यार्थ्यांनी आपण मिळवलेल्या ज्ञानाचा समाजाच्या प्रगतीसाठी उपयोग केला पाहिजे. तरच विद्यार्थी ज्ञानी व शहाणे होतील. परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी पदवी प्रमाणपत्रांचा आढावा घेतला. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले. यावेळी श्रीमंत शाहू छत्रपती, उच्च व तंत्र शिक्षण कोल्हापूर विभागीय सहाय्यक शिक्षण सहसंचालक डॉ. अशोक उबाळे, अधिकार मंडळाचे सदस्य डॉ. व्ही. एम. पाटील, डॉ. शेजवळ, डॉ. एम. एस. ठाकूर, डॉ. श्रीकृष्ण महाजन, अधिसभा सदस्य धैर्यशील यादव, डॉ. निशा पवार, डॉ. घुनाथ ढमकले, किसनराव कुऱ्हाडे, दलितमित्र व्यंकाप्पा भोसले, नंदिनी पाटील आदी उपस्थित होते.

- साईसिमरन घाशीस राष्ट्रपती सुवर्णपदक तर बिल्कीस गवंडीस कुलपती सुवर्णपदक प्रदान

### सेवानिवृत्त पोलीस उपअधिक्षक आर. आर. पाटील यांनी घेतली कायद्याची पदवी

सेवानिवृत्त पोलीस उपअधीक्षक आर. आर. पाटील यांनी एलएलबी जनरल विषयाचे पदवी प्रमाणपत्र विद्यापीठात उपस्थित राहून स्वीकारले. ३७ वर्षे पोलीस खात्यात काम करून सेवानिवृत्तीनंतरही शिक्षण घेण्याचा त्यांचा ध्यास तरुणांना प्रेरणा देणारा आहे. १९८४ साली त्यांनी विज्ञान शाखेतून पदवी संपादन केली होती. पोलीस उपनिरीक्षक पदापासून त्यांनी पोलीस उपअधिक्षक पदापर्यंतचा यशस्वी प्रवास पूर्ण करीत सेवानिवृत्त झाले. त्यानंतरही न थांबता एलएलबीचे शिक्षण घेतले आहे. पदवी मिळाल्याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

19 DEC 2023
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर




**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचा हीरक महोत्सवी दीक्षान्त सोहळ्यात सोमवारी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते राष्ट्रपती सुवर्णपदक स्वीकारताना साईसिमरन घाशी आणि कुलपती सुवर्णपदक स्वीकारताना विल्कीस गवंडी. यावेळी डावीकडून कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. एस. एस. मंथा, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, डॉ. अजितसिंह जाधव. (आणखी वृत्त पान ७ वर >)
(वी. डी. चेचर : सकाळ छायाचित्रसेवा)

# विद्यार्थ्यांतून उद्योजक घडवा

## डॉ. मंथा ; विद्यापीठांनी पूरक वातावरण जोपासावे

▶ सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. १८ :** विद्यापाठांनी विद्यार्थी उद्योजक म्हणून घडावेत, यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेचे माजी अध्यक्ष डॉ. एस. एस. मंथा यांनी आज येथे केले. विद्यापीठांनी पूरक प्रयत्न, निधीची सुविधा आणि पालकत्व कार्यक्रमातून वातावरण जोपासावे. नावीन्य, लवचिकता, ध्येयपूर्ती मनात ठेवून यापुढे मार्गक्रमण करावे, असा सल्लाही त्यांनी यावेळी दिला.

शिवाजी विद्यापीठाच्या साठाव्या दीक्षान्त सोहळ्यात ते प्रमुख पाहुणे



डॉ. मंथा

म्हणून बोलत होते. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के अध्यक्षस्थानी होते. यावेळी श्रीमंत छत्रपती शाहू महाराज, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील प्रमुख उपस्थित होते.

राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात झालेल्या या सोहळ्यात बत्तीस शिराळा (जि. सांगली) येथील साईसिमरन हिदायत घाशी हिला सर्वसाधारण कौशल्यासाठीचे राष्ट्रपती सुवर्णपदक,

पान ११ वर >

### नवपदवीधरांना सल्ला

- प्रत्येक गोष्ट विश्वास आणि समर्पणाच्या भावनेने करा
- आयुष्यात मोठे ध्येय ठेवा. मोठे स्वप्न पाहा
- अपयशाला स्वीकारा त्यातून शिका आणि यशाची नवीन शिखरे गाठा
- भविष्यात करिअर आणि जीवनात येणारी आव्हाने पेलण्याची तयारी करा
- वैविध्यपूर्ण दृष्टिकोन स्वीकारा तरच गर्दीत वेगळे दिसाल

19 DEC 20??

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यार्थ्यांतून उद्योजक घडवा

> पान १ वरून

तर मौजे आगर (ता. शिरोळ) येथील बिल्कीस हिदायत गवंडी हिला हिंदी विषयात सर्वाधिक गुण मिळविल्याबद्दल कुलपती सुवर्णपदक कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते देऊन सन्मानित करण्यात आले. विद्यार्थी, पालकांची गर्दी आणि उत्साहात हीरक महोत्सवी दीक्षान्त सोहळा झाला. यावर्षी एकूण ४९ हजार ४३८ स्नातकांना पदवी प्रदान करण्यात आली.

डॉ. मंथा म्हणाले, 'विद्यार्थी विद्यापीठाचे राजदूत होतात; तेव्हाच समाजामध्ये एखाद्या विद्यापीठाची प्रतिमा तयार होते. त्यामुळे विद्यापीठांनी तंत्रज्ञानाचा अवलंब करावा. अभ्यासक्रमात 'गेमिफिकेशन आणि इंटरएक्टिव्ह डिजिटल लर्निंग प्लॅटफॉर्म' एकत्रित करावीत. अत्याधुनिक संशोधन सुविधांमध्ये गुंतवणूक करावी. प्राध्यापक, विद्यार्थी, उद्योग भागीदार यांच्यातील सहकार्य आणि संशोधनातील उत्कृष्टता ओळखून त्याला प्रोत्साहन द्यावे. शिवाजी विद्यापीठाच्या नवपदवीधरांकडे ज्ञान, कौशल्ये आणि अनुभवांचा एक पेटारा आहे. जो त्यांना परंपरागत सीमा पार करण्यास सक्षम करेल.''

## उच्च शिक्षणाला अधिक निधी हवा!

■ उच्च शिक्षण घेणारे विद्यार्थी बहुअंगाने समाजासाठी महत्त्वाचे आहेत. त्यामुळे उच्च शिक्षणावर जीडीपीच्या केवळ १.४ टक्के खर्च करणे गुणवत्तेला मारक ठरणारे आहे. या शिक्षणावरील खर्चात शासनाकडून वाढ होणे आवश्यक असल्याचे डॉ. मंथा यांनी सांगितले.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, ''सर्व नवपदवीधर एका नव्या जगात प्रवेश करणार आहेत. ते वेगवान, स्पर्धेचे आहे. त्यात टिकून यशस्वी होण्यासाठी पदवीसह काही महत्त्वाची जीवन आणि तंत्रकौशल्ये आत्मसात करावीत. त्यामुळे पुढील कार्यकाळ आशादायी, सुखद, उज्ज्वल होण्यास मदत होईल.'' प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी विद्यापीठाचा वार्षिक अहवाल मांडला. परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी आढावा घेतला. यावेळी व्यंकाप्पा भोसले, किसन कुराडे, नामदेवराव कांबळे आदींसह विद्यार्थी, प्राध्यापक, अधिकार मंडळांचे सदस्य, अधिष्ठाता उपस्थित होते. धैर्यशील यादव, नंदिनी पाटील यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी आभार मानले.

### तीन भाषेतून संवाद

डॉ. मंथा यांनी ऋग्वेद, भगवद्गीता आणि संस्कृतमधील श्लोक, उदाहरणे सांगत मराठी, हिंदी, इंग्रजी भाषेतून संवाद साधला. त्यांनी नवनिर्मितीचे सामर्थ्य, सकारात्मक मानसिकता, बदल, श्रद्धा आणि समर्पणातून ज्ञानाची प्राप्ती, परिवर्तनाला हातभार लावणारी कृती आदींबाबत नवपदवीधरांना मार्गदर्शन केले.

19 DEC 2023 पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यार्थ्यांमुळेच विद्यापीठाची प्रतिमा

## प्रा. एस. एस. मंथा : शिवाजी विद्यापीठाचा ६० वा दीक्षांत समारंभ उत्साहात

कोल्हापूर : प्रतिनिधी

समाजामध्ये एखाद्या विद्यापीठाची प्रतिमा तेव्हाच तयार होते, जेव्हा त्या विद्यापीठाचे विद्यार्थी त्या विद्यापीठाचे दूत बनतात. त्यामुळे विद्यापीठांनी सक्रियपणे विद्यार्थी उद्योजकतेला समर्थन देणारे वातावरण जोपासयाला हवे, असे प्रतिपादन ऑल इंडिया कौन्सिल ऑफ टेक्निकल एज्युकेशन (एआयसीटीई) माजी चेअरमन प्रा. एस. एस. मंथा यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या ६० व्या दीक्षांत समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. सोहळयाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के होते.




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ६० व्या दीक्षांत समारंभात स्नातकांना मार्गदर्शन करताना एआयसीटीई माजी चेअरमन प्रा. एस. एस. मंथा.

प्रा. मंथा म्हणाले, ज्या विद्यापीठातील विद्यार्थी त्याचे स्टार्टअप्स यशस्वी करतात, ती विद्यापीठे नाविन्यपूर्ण आणि व्यावहारिक कौशल्य विकासाला चालना देतात असे समाजात मानले जाते. नवोन्मेष म्हणजे केवळ नवीन वस्तू किंवा नवीन पद्धत बनवणे असे नाही, तर यासाठी ही अशी एक मानसिकता असायला हवी जी सतत सुधारण्याचा, वातावरणाशी जुळवून घेण्याचा आणि सकारात्मक बदल घडवण्याचा प्रयत्न करत राहील.

विविध पार्श्वभूमी असलेल्या आणि विविध विषयावर काम करणाऱ्या व्यक्ती जेव्हा एकत्र येतात तेव्हा काही अत्यंत क्रांतिकारी ▸▸ पान ७ वर...

## विद्यार्थ्यांमुळेच विद्यापीठाची प्रतिमा

कल्पनांचा उदय होतो. आपली विविधता ही आपली शक्ती आहे आणि विविध दृष्टीकोन स्वीकारण्याच्या आपल्या क्षमतेमुळेच आपली प्रगती होते. आयुष्यात मोठे ध्येय ठेवा, मोठे स्वप्न पहा, यश आणि अपयश हा आपल्या प्रवासाचा भाग आहे. त्यामुळे दोघांनाही स्वीकारायची मनाची तयारी ठेवा.

**स्पर्धात्मक जगात जीवन कौशल्ये, तंत्रकौशल्य आत्मसात करा : कुलगुरु**

अध्यक्षीय भाषणात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, पदवीनंतर आपण नव्या युगात प्रवेशित झाला आहे. हे नवे जग वेगवान आणि स्पर्धेचे आहे. ही स्पर्धा जिंकण्यासाठी तुम्हाला पदवीबरोबरच आणखीनही जीवन कौशल्ये आणि तंत्रकौशल्य आत्मसात करावी लागणार आहेत. त्यामुळे तुमचा पुढील काळ सुखद होण्यास मदत होईल. आपण करीत असलेले काम निष्ठेने व प्रमाणीकपणे करा. त्यामुळे तुम्हाला यश व समाधन मिळेल. यावेळी विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी वार्षीक अहवालाचे वाचन केले. आभार कुलसचीव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी मानले. यावेळी श्रीमंत शाहू महाराज यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 DEC 2022
Times of India

# Joy, enthusiasm at SUK convocation

Rahul.Gayakwad
@timesgroup.com

Rahul Gayakwad



Students celebrate their degree certificates

**Kolhapur**: Dr Shankar S. Mantha encouraged students to 'aim big in life' and 'prepare to accept both success and failure' at the 60th convocation ceremony of Shivaji University, Kolhapur (SUK).

The former president of All-India Council of Technical Education (AICTE) and current CEO of Maha-Preit Startup Center was the chief guest at the ceremony, which was held at Rajmata Jijausaheb Auditorium at the SUK campus on Monday.

Vice-chancellor Dr Shirke also spoke on success. "The new world is competitive. To win this competition, students need to acquire new technical skills along with their degrees. Not everyone's educational journey is the same. Many had to go through struggles."

A total of 49,438 degree certificates were distributed at the ceremony. Saisimran Hidayat Ghashi from Sangli district was awarded the 'President's Gold Medal' for her performance in General Skills, while Bilkis Hidayat Gawandi from Kolhapur district was honoured the 'Chancellor's Gold Medal' for scoring the highest marks in Hindi in Master of Arts.

Head of the royal family of Kolhapur Shahu Maharaj Chhatrapati, SUK vice-chancellor Dr Digambar Shirke, pro vice-chancellor Dr Pramod Patil, registrar Dr Vilas Shinde and director of Board of Examinations and Evaluation Dr Ajitsinh Jadhav were present at the occasion.

19 DEC 2023 पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर




कोल्हापूर : पदवी प्रमाणपत्र मिळाल्यानंतर स्नातकांनी मुख्य इमारतीसमोरील उद्यानात जल्लोष केला. (सर्व छाया : पांडुरंग पाटील)

# हीरकमहोत्सवी दीक्षांत सोहळ्यात विद्यार्थ्यांचा उत्साह

## शिवाजी विद्यापीठ परिसर स्नातकांच्या गर्दीने फुलला; ९६०५ विद्यार्थ्यांची उपस्थिती

कोल्हापूर : प्रतिनिधी

अनेक दिवसांनी भेटलेल्या मित्र-मैत्रिणी... भविष्यातील संधी खुल्या करून देणाऱ्या पदवीचे मिळालेले प्रमाणपत्र... विद्यापीठाकडून झालेले कौतुक... अशा आनंददायी आणि उत्साही वातावरणात शिवाजी विद्यापीठाचा हीरकमहोत्सवी अर्थात ६० वा दीक्षान्त समारंभ पार पडला.

या दीक्षांत समारंभासाठी शिवाजी विद्यापीठाचा अवघा परिसरच सजला गेला होता. त्याचप्रमाणे सजून धजून विद्यार्थी-विद्यार्थीनी विद्यापीठात दाखल झाले होते. सकाळी नऊ वाजल्यापासून विद्यार्थ्यांनी विद्यापीठ परिसरात गर्दी करण्यास सुरूवात केली होती. मित्र-मैत्रिणींसोबत गप्पा मारत पदवीपर्यंतच्या प्रवासातील अनेक आठवणींना उजाळा दिला जात होता. त्याचबरोबर पदवीचे प्रमाणपत्र हाती मिळाल्यानंतर अभिमानाने ते हातात घेऊन तो क्षण कॅमेराबध्द केला जात होता.



कोल्हापूर : दीक्षांत समारंभापूर्वी ज्ञानदंड घेऊन जाताना परीक्षा व मुल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव सोबत विविध अधिविभागाचे प्रमुख.

### आर. आर. पाटील यांनी घेतली विधी पदवी

निवृत्त पोलिस उपअधीक्षक म्हणून आर. आर. पाटील यांनी वयाच्या ६३ व्या वर्षी विधी शाखेची पदवी घेतली. त्यांनी विद्यापीठात उपस्थित राहून प्रत्यक्ष पदवी स्वीकारली. यावेळी शाहूवाडीचे पोलिस उपअधीक्षक सूर्यवंशी आणि विद्यापीठात बंदोबस्ताला असणाऱ्या पोलिस सहकाऱ्यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले.

### दूर्मीळ ग्रंथाच्या खरेदीस गर्दी

शिवाजी विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभाचे औचित्य साधून ग्रंथ महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये अनेक नामांकीत प्रकाशक व ग्रंथविक्रेते सहभागी झाले आहेत. या स्टॉलवर सकाळपासूनच विद्यार्थ्यांनी गर्दी केली होती. अनेक विद्यार्थ्यांनी दूर्मीळ ग्रंथाची खरेदी या ठिकाणी केली. त्याचबरोबर याठिकाणी असलेल्या खाद्य पदार्थांच्या स्टॉलवर विविध पदार्थांचा आस्वाद घेतला.

### आनंदावर विरजण

राज्यपाल तथा विद्यापीठाचे कुलपती रमेश बैस हे दीक्षांत समारंभाचे अध्यक्षस्थान भूषविणार होते. त्यांच्या उपस्थितीमध्ये गौरव होणार असल्याने पदक विजेते, पुरस्कार प्राप्त तसेच पीएचडीधारक स्नातकांमध्ये विशेष उत्साह होता. प्रशासनाने ही याबाबतची तयारी केली होती. मात्र सोमवारी सकाळी त्यांचा दौरा रद्द झाल्याने त्यांच्या आनंदावर विरजण पडले.



### प्रमाणपत्रे घेण्यास रांगा...



प्रत्यक्ष उपस्थित राहून पदवी प्रमाणपत्रे स्वीकारणाऱ्या स्नातकांना पदवी वितरणासाठी परीक्षा भवन क्रमांक २ च्या प्रांगणात ३३ बूथ उभारण्यात आले होते. प्रत्येक बूथवर ३०० पदवी प्रमाणपत्रांच्या वितरणाचे नियोजन करण्यात आले होते. गर्दी व गोंधळ टाळण्यासाठी नोंदणीकृत स्नातकांना त्यांच्या पदवीच्या वितरणाची माहिती एसएमएसद्वारे कळविण्यात आली होती. त्याशिवाय त्या ठिकाणी क्यूआर कोडचीही व्यवस्था केली. ते स्कॅन करून मोबाईल क्रमांक अथवा पीआरएन क्रमांक टाकल्यानंतर दीक्षांत क्रमांक तसेच बूथ क्रमांकही समजत होता.



साईसिमरन घाशी



बिल्कीस गवंडी

### विद्यार्थ्यांचा गौरव...

शिवाजी विद्यापीठाच्या एम. ए. (मास. कॉम.) अधिविभागाची विद्यार्थिनी साईसिमरन घाशी (मूळ गाव बत्तीसशिराळा) हिला सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षासाठीचे राष्ट्रपती सुवर्णपदक, तर जयसिंगपूर कॉलेजची विद्यार्थिनी बिल्कीस गवंडी (मु. पो. आगर, ता. शिरोळ) हिला कुलपती सुवर्णपदक प्रदान करण्यात आले. दीक्षांत समारंभात ४९,४३८ स्नातकांना पदवी प्रमाणपत्रे प्रदान केली जात आहे. यामध्ये मुलींची संख्या २७,४७५ इतकी आहे. एकूण स्नातकांपैकी ९ हजार ६०५ जण प्रत्यक्ष उपस्थित राहीले. तर ३९ हजार ८३३ जण पोस्टाव्दारे पदवी स्वीकारणार आहेत.



19 DEC 2023

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दीक्षान्त समारंभात नवपदवीधरांचा उत्सव; शिवाजी विद्यापीठ परिसर फुलला

# गप्पा, सेल्फी अन् जल्लोष...

▶ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १८ : गप्पा, सेल्फी अन् जल्लोष अशा उत्साही वातावरणात शिवाजी विद्यापीठाच्या हीरकमहोत्सवी दीक्षान्त समारंभात आज नवपदवीधरांचा आनंदोत्सव रंगला.

विद्यापीठात सकाळी नऊपासून विद्यार्थी येऊ लागले. पीएच.डी. पदवी, पारितोषिकप्राप्त विद्यार्थी कुटुंबीयांसमवेत होते. परीक्षा भवन परिसरात पदवी प्रमाणपत्र वितरण करणाऱ्या स्टॉलमधून प्रमाणपत्र घेतल्यानंतर विद्यार्थी थेट मुख्य इमारतीसमोरील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याच्या परिसरात छायाचित्र, सेल्फी टिपून घेत होते. काहींनी अधिविभाग परिसरात फेरफटका मारून जुन्या आठवणींना उजाळा दिला. दरम्यान, दीक्षान्त समारंभ मिरवणूक आकर्षण ठरली. त्यात ज्ञानदंड घेऊन परीक्षा मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव अग्रभागी आणि त्यामागे कुलगुरू, प्र-कुलगुरू, कुलसचिव, अधिष्ठाता, अधिकार मंडळांचे सदस्य होते. ही मिरवणूक राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात आल्यानंतर समारंभ सुरू झाला. यावेळी ग्रंथमहोत्सवाला विद्यार्थी, प्राध्यापक आदींनी हजेरी लावली.



**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या हीरक महोत्सवी दीक्षान्त समारंभात सोमवारी नवपदवीधर विद्यार्थिनींनी अशी उडी घेत आनंद व्यक्त केला. (बी. डी. चेचर : सकाळ छायाचित्रसेवा)

### १७ जणांना पारितोषिक, ४६ पीएच.डी.

यावेळी ४६ विद्यार्थ्यांना पीएच. डी. पदवी प्रदान केली. विविध अभ्यासक्रमांच्या १७ विद्यार्थ्यांना पारितोषिक देऊन सन्मानित केले. त्यात गिरीश शिंदे, स्नेहल बुरसे, धैर्यशील जाधव, अंकिता पाटील, प्रणिल चव्हाण, समृद्धी पाटील, हर्षदा जगताप, अमृता आवटी, अंकिता शिंदे, रोहिणी नलवडे, अर्चना कुराडे, सुमित जाधव, स्नेहल झरेकर, सौरभ मिसाळ, अश्विनी सुवरे, शीतल गुजर, शीतल पाटील यांचा समावेश होता.

### निवृत्त पोलिस उपअधीक्षक आर. आर. पाटील 'पदवीधर'

निवृत्त पोलिस उपअधीक्षक आर. आर. पाटील यांनी आज दीक्षान्त समारंभात एलएलबीची पदवी घेतली. निवृत्तीनंतर त्यांनी या अभ्यासक्रमासाठी शिवाजी विद्यापीठात २०२१ मध्ये प्रवेश घेतला होता. ते १९८४ मध्ये विज्ञान शाखेतून पदवीधर झाले होते.

### मदत क्यूआर कोडची

विद्यापीठाच्या शिववार्ता यू-ट्यूब चॅनेलवरून समारंभाचे थेट प्रक्षेपण झाले. त्यात विद्यार्थी, शिक्षक अशा एक हजार जणांनी उपस्थिती लावली. पदवी प्रमाणपत्र वितरित करण्यासाठी बूथची व्यवस्था होती. बूथ माहिती देण्यासाठी आयटी सेलने क्यूआर कोडची सुविधा केली होती. त्याद्वारे विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र आणि बूथ क्रमांकांची माहिती मिळण्यास मदत झाली.



“ मला मिळालेली पदवी ही कष्टाची, प्रतिस्पर्धात्मक जिद्दीची आणि कुटुंबीय, शिक्षक, मार्गदर्शकांच्या पाठबळाचे फळ आहे.

**- निकिता बागणे,** बी. ए. इंग्लिश



“ या पदवीच्या माध्यमातून जे ज्ञान मी मिळवले ते माझ्या क्षेत्रात सकारात्मक वापर करण्याची मला संधी देणार आहे.

**- चेतन सूर्यवंशी,**
एम. ए. मास कम्युनिकेशन



“ मला पीएच.डी. पदवी मिळाल्याचा खूप आनंद होत आहे. संशोधनासाठी मला विद्यापीठातून चांगले सहकार्य लाभले.

**- सुरेश खोत,**
राज्यशास्त्र अधिविभाग

19 DEC 2023 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# हातात पदवी प्रमाणपत्र अन् खुललेले चेहरे

## विद्यापीठ पदवी प्रदान सोहळ्यात तरुणाईचा सळसळता उत्साह

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिक्षण संपवून भविष्याची स्वप्ने रंगवणाऱ्या तरुणाईसाठी पदवी प्रदान हा आयुष्याचा महत्त्वाचा टप्पा असतो. शिवाजी विद्यापीठाच्या ६० व्या पदवी प्रदान सोहळ्यात सोमवारी (दि. १८) सळसळत्या तरुणाईचा उत्साह, भविष्याचे स्वप्नरंजन, व्यक्तिगत, कौटुंबिक संघर्षाची प्रतिपूर्ती, अशा संमिश्र भावनांचा प्रत्यय आला. हजारो विद्यार्थ्यांनी पदवी प्रमाणपत्र स्वीकारण्यासाठी गर्दी केली.

विद्यापीठ आवारातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासमोर छायाचित्र टिपण्यासाठी विद्यार्थ्यांची गर्दी ओसंडून वाहत होती. विद्यापीठाने अनेक फोटोग्राफर्सना परिसरात फोटो काढण्यास परवानगी दिली होती. काउंटरवर पैसे भरून पदवी प्रमाणपत्रासोबत आपले छायाचित्र तिथल्या तिथे प्रिंट करून घेण्यासाठी अनेकजण उत्सुक होते. शिवाय मोबाईलवर सेल्फी काढण्याचाही मोह अनेकांना आवरला नाही.

पारंपरिक वेशातील तरुण-तरुणी, विद्यापीठाचे नाव असलेला गमछा घालून मोबाईलवर फोटो काढताना दिसत होते. अनेकजण कुटुंबासह आले होते. त्यामुळे फोटो काढण्याचा कौटुंबिक सोहळाही रंगलेला दिसत होता. पदवी घेतल्यानंतर मित्र-मैत्रिणींच्या वाटा भिन्न होणार होत्या, म्हणून अनेकजण आठवण म्हणून ग्रुप फोटो काढून घेताना दिसत होते. सकाळपासून शिवाजी विद्यापीठ परिसर गर्दीने फुलून गेला होता. विद्यापीठाच्या बाहेरील रस्त्यावरदेखील वाहनांच्या मोठ्या रांगा लागल्या होत्या.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाची पदवी स्वीकारल्यानंतर आनंद साजरा करताना विद्यार्थिनी. (छाया : पप्पू अत्तार)

### पिता-पुत्रांना एकाच वेळी पदवी



ॲड. श्रीकांत काळाई यांनी वयाच्या ५३ व्या वर्षी एलएल.एम.ची, तर त्यांचा मुलगा पुष्कर याने वयाच्या २२ व्या वर्षी बी.कॉम.ची पदवी स्वीकारली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासमोर दोघांनी फोटो काढला. दोघांनीही विशेष प्रावीण्य मिळवले आहे.

### नोकरी आणि कुटुंब सांभाळून पीएच.डी.



कोल्हापूरच्या नीता साठे यांनी कुटुंब आणि नोकरीची जबाबदारी पार पाडत हिंदी विषयात पीएच.डी. मिळवली. साठे यांना दोन वर्षांची मुलगी आहे. त्यांचे पती नीलेश हेगडे यांची त्यांना साथ मिळाली. हे संपूर्ण कुटुंब पदवी स्वीकारण्यासाठी आले होते.

### निवृत्तीनंतर वकिलीची पदवी



निवृत्त पोलिस उपअधीक्षक आर. आर. पाटील यांनी भारती विद्यापीठाच्या विधी महाविद्यालयात कायद्याचा अभ्यास पूर्ण करून पदवी मिळवली. निवृत्तीनंतर कामात गुंतवले पाहिजे. शिक्षणाला वय नसते, फक्त शिकायची इच्छा पाहिजे, असे पाटील म्हणाले.

### ओंकार बडोदेच्या जिद्दीला सलाम



सांगलीच्या चिमणराव व्यापार कॉलेजमधून अकाऊंट विषयात पदवी मिळवणारा ओंकार महेश बडोदे आई-वडिलांसोबत पदवी स्वीकारण्यासाठी आला होता. मस्क्युलर डिस्ट्रोफी आजाराशी झगडणारा ओंकार व्हीलचेअरवरून कॉलेजला जात होता.

19 DEC 2023

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर





कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात सोमवारी हीरक महोत्सवी पदवीदान सोहळ्यात प्रमाणपत्र स्वीकारल्यानंतर जल्लोष करताना पदवीधारक.. (छाया : शशिकांत मोरे)

# विद्यापीठात जल्लोष हीरक महोत्सवी दीक्षांताचा

**दीक्षांत समारंभास यात्रेचे रूप**

**शिवाजी विद्यापीठाचा हीरक महोत्सवी दीक्षांत समारंभ सोमवारी उत्साहात झाला. विद्यापीठ परिसरात सकाळपासून यात्रेचे रूप आले. विद्यार्थी मित्र-मैत्रिणींनी कट्ट्यावर बसून आठवणींना उजाळा दिला. जल्लोषी वातावरणात हीरक महोत्सवी दीक्षांत सोहळ्याची ही तरुणाई साक्षीदार बनली. तरुणाईच्या जल्लोषाने परीसर फुलून गेला.**

प्रतिनिधी
कोल्हापूर

पदवीसाठीचे मानवशास्त्र गळ्यात घालून दिवसभर विद्यार्थी फिरत होते. चेष्टामस्करीसह; फोटोसेशन, सेल्फीत दंग होते. आनंदाचे डोही...आनंद तरंग.. अशा वातावरणाने परिसर भारून गेला. पदवी स्वीकारल्यानंतर आणि दीक्षांत समारंभाचा मुख्य कार्यक्रम संपल्यानंतर विद्यार्थ्यांनी खाद्यपदार्थांच्या स्टॉलवर गर्दी केली. परिसरात जणू विद्यार्थ्यांचा मेळाच भरला. अनेकजण चहापानात गुंग होते. ज्या गुणवंत विद्यार्थ्यांना पारितोषिक मिळणार होते त्यांचे पालक व मित्र-मैत्रिणींनीही सभागृहात हजेरी लावली. पदवीनंतर पुढे काय, असा प्रश्न करत पदवीधारकांच्या डोळ्यांत उच्च शिक्षणाची स्वप्ने दाटली. उच्च पदवी, स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून शासकीय अधिकारी होण्याचे ध्येय असल्याचे अनेकांनी स्पष्ट केले.

कर्मचाऱ्यांनी दिली कामे वाटून दीक्षांत समारंभाची वेगळी कामे कर्मचाऱ्यांना वाटून दिल्यामुळे पदवी प्रमाणपत्रांच्या स्टॉलवर सकाळपासून गर्दी नव्हती. पीएच.डी. व गुणवंत गळ्यात मानवस्त्र घालून फिरत होते. त्यांना रांगेत उभे करणे, खुर्च्या मांडण्यापासून ते स्टेजवरील बैठक व्यवस्थेपर्यंत प्रत्येक समितीने आपआपली कामे पार पाडली.

**तीन वर्षांचा प्रवास पूर्ण झाल्याचा आनंद**

पदवीचे शिक्षण घेताना तीन वर्षे जे चढ-उतार आले. पदवी प्रमाणपत्र घेतल्यानंतर आनंद झाला. तीन वर्षांचा प्रवास पूर्ण झाला. पुढील शिक्षण घेण्यास प्रेरणा मिळाली.

**श्रुती खराडे (विद्यार्थिनी, विजयसिंह यादव कॉलेज, पेठवडगाव)**

**आशा पालवल्या**

पदवी प्रमाणपत्रासाठी विद्यापीठात आलो. पारितोषीक आणि पीएच.डी. घेणाऱ्या स्नातकांचा झालेला सत्कार पाहून पुढील शिक्षण घेण्याच्या आशा पालवल्या. प्रेरणाही मिळाली.

**प्रथमेश गुरव (विद्यार्थी, डी. डी. शिंदे सरकार कॉलेज)**

**मुलीचे यश माझा अभिमान**

मुलीने शिक्षण घेऊन राष्ट्रपतीपदक प्राप्त केले, याचा अभिमान प्रत्येकाने मुला-मुलीवर विश्वास ठेवून शिक्षण द्यावे. घरच्यांचा सपोर्ट असेल तर मुलं कोणतेही यश मिळवण्यास तयार असतात.

**शैनाज घाशी (आई, साईसिमरन घाशी, राष्ट्रपती सुवर्णपदक विजेती)**

19 DEC 2023

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या दीक्षांत सोहळ्यासाठी आलेल्या विद्यार्थ्यांमुळे विद्यापीठ प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसर गर्दीने फुलून गेला होता. (सर्व छाया : पप्पू अत्तार)



दीक्षांत सोहळ्यात ज्ञानदंड घेऊन जाताना डॉ. अजितसिंह जाधव व अन्य मान्यवर.

# नवपदवीधरांचा जल्लोष...

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभात तरुणाईच्या सळसळत्या उत्साहाने वातावरण भारावून गेले. नवीन पदवीधर कठोर परिश्रमाने घेतलेल्या पदवीचा मित्रांसमवेत आनंद घेत होते. आयुष्यातील मित्र-मैत्रिणींसोबतचे हे अविस्मरणीय क्षण मोबाईलच्या कॅमेऱ्यात टिपण्यासाठी प्रत्येकाची धडपड सुरू होती. आई-वडील, मुलांसमवेत पदवी घेतल्याचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर दिसत होता. समारंभाच्या निमित्ताने विद्यापीठातील वातावरण 'विद्यार्थीमय' झाले होते.





19 DEC 2023

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



# हुर्रे ऽऽऽ आम्ही पदवीधर झालो...

शिवाजी विद्यापीठाचा ६० वा दिक्षांत समारंभ सोमवारी मोठ्या उत्साहात पार पडला. त्यानंतर मुख्य इमारतीसमोरील छत्रपती शिवाजी महाराज वर्तुळ उद्यानामध्ये पदवीसमवेत छायाचित्रे काढून घेण्यासाठी विद्यार्थ्यांचा उत्साह ओसंडून वाहत होता. आम्ही पदवीधर झाल्याचा आनंद मित्र-मैत्रिणींच्या एका गटाने असा उडी मारुन साजरा केला. -/ वृत्त ४ वर (छाया : आदित्य वेल्हाळ)

19 DEC 2023

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर








## दीक्षांत समारंभ....

कोल्हापूर : १) दीक्षांत समारंभापुर्वी मिरवणुकीने ज्ञानदंड घेऊन जाताना परीक्षा संचालक डॉ. अजितसिंह जाधव, सोबत सर्व अधिकार मंडळ सदस्य. २) निवृत्त पोलीस उपअधिक्षक आर. आर. पाटील यांनी एलएलबी जनरल पदवी घेतली. ३) पीएच.डी. घेतल्यानंतरचा क्षण कुटुंब आणि सहकाऱ्यांबरोबर कॅमेऱ्यात कैद करताना जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षणाधिकारी एकनाथ आंबोकर. (छाया: शशिकांत मोरे)

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 DEC 2023
सकाळ



कोल्हापूर : येथे ५३ वर्षीय ॲड. श्रीकांत एस. काळाई आणि त्यांचा २२ वर्षीय मुलगा पुष्कर यांनी दीक्षान्त समारंभात एकाचवेळी पदवी घेतली.

# काळाई पिता-पुत्राने घेतली एकत्रित पदवी

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १८ : शिवाजी विद्यापीठाच्या ६० दीक्षान्त समारंभात आज मेजर ध्यानचंद हॉकी स्टेडियम परिसरातील पाडळकर वसाहतीमध्ये राहणाऱ्या काळाई पिता-पुत्राने एकत्रित पदवी घेतली. ५३ वर्षीय ॲड. श्रीकांत एस. काळाई हे एलएलएम अभ्यासक्रमाचे आणि त्यांचा २२ वर्षीय मुलगा पुष्कर बी. कॉम. अभ्यासक्रमाचा एकाचवेळी पदवीधर झाले.

ॲड. काळाई यांनी २०१७ मध्ये एलएलबीचे शिक्षण पूर्ण केले. पुढे एलएलएम अभ्यासक्रमाला प्रवेश घेतला. यात २०२२ मध्ये ते उत्तीर्ण झाले. त्यांचा मुलगा पुष्कर त्यावेळी बी. कॉम. अभ्यासक्रमाचे शिक्षण घेत होता. त्यानंतर त्यांनी एकाचवेळी पदवी घेण्याचे ठरविले. त्यानुसार त्यांनी आज पदवीप्रमाणपत्र घेतले. दोघेही विशेष प्रावीण्य मिळवत उत्तीर्ण झाले. ॲड. काळाई कोल्हापुरात वकिली करतात. पुष्कर मुंबईत गर्व्हन्मेंट लॉ कॉलेजला एलएलबी करत आहे. वडिलांसमवेत पहिलीच पदवी घेतल्याचा आनंद वाटत आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली एलएलबी करणार असल्याची प्रतिक्रिया पुष्करने व्यक्त केली.

> मी कार्यरत असलेल्या क्षेत्रात पदव्युत्तर पदवी आणि तीही मुलगा पुष्कर समवेत घेत असल्याचा खूप आनंद वाटत आहे. माझ्या आयुष्यातील एक सोनेरी क्षण आज अनुभवला आहे. विद्यापीठाच्या हीरक महोत्सवी दीक्षान्त समारंभात पदवी मिळाल्याने त्याला एक वेगळे महत्त्व आहे.
> **- ॲड. श्रीकांत काळाई**

लोकमत

# १८ विद्यार्थ्यांचा सन्मान

विविध परीक्षा व विषयांमध्ये अव्वल स्थान पटकाविलेल्या १८ विद्यार्थ्यांना पारितोषिक देऊन सन्मानित केले. यात साईसिमरन घाशी (राष्ट्रपती सुवर्णपदक), बिल्कीस गवंडी (कुलपती सुवर्णपदक), गिरीश शिंदे (एम. ए. राज्यशास्त्र सर्वाधिक गुण- दहिवडी), स्नेहल बुरसे (एम. ए. समाजशास्त्र प्रथम क्रमांक- उचगाव), धैर्यशील जाधव (एम. ए. इतिहास सर्वाधिक गुण- उचगाव, ता. करवीर), अंकिता पाटील (एम. ए. भूगोल सर्वाधिक गुण- किणी, ता. हातकणंगले), प्रणील चव्हाण (सिल्व्हर ज्युबली स्कॉलरशिप- बुरुंगवाडी, ता. पलूस), समृद्धी पाटील (एम. ए. मास कम्युनिकेशन सर्वाधिक गुण- चुये), हर्षदा जगताप (एम.एस्सी. फिजीकल केमिस्ट्री सर्वाधिक गुण- मनपाडळे), अमृता आवटी (एम.एस्सी. ऑरगॅनिक केमिस्ट्री सर्वाधिक गुण- कुपवाड), अंकिता शिंदे (एम.एस्सी. झुलॉजी सर्वाधिक गुण- विटा, ता. खानापूर), रोहिणी नलवडे (एम.एस्सी. मायक्रोबायोलॉजी मुलींमध्ये प्रथम- करनूर), अर्चना कुराडे (एम.एस्सी. गणित प्रथम - येणचवंडी), सुमित जाधव (एम.एस्सी. अॅग्रो केमिकल अँड पेस्ट मॅनेजमेंटमध्ये प्रथम- कडलास, जि. सोलापूर), स्नेहल झरेकर (एम.एस्सी. संख्याशास्त्र सर्वाधिक गुण- बोरगाव, ता. तासगाव), सौरभ मिसाळ (एम.एस्सी. गणित विषयात मुलांमध्ये प्रथम- येळवडे, ता. राधानगरी,) अश्विनी सुवरे (एम.एस्सी. इनऑरगॅनिक केमिस्ट्री सर्वाधिक गुण- बांबवडे), शीतल पाटील (बॅचलर ऑफ लायब्ररी अँड इन्फॉरमेशन सायन्स प्रथम क्रमांक- आरळे, ता. पन्हाळा), शीतल गुजर (मास्टर ऑफ लायब्ररी अँड इन्फॉरमेशन सायन्स प्रथम क्रमांक- दहिवडी) यांचा समावेश आहे.

## एकनाथ आंबोकर यांनाही पीएच.डी.

विद्यापीठातील ४६ जणांना पीएच. डी. पदवी प्रदान करण्यात आली. यामध्ये २६ पीएच.डी. या सायन्स अँड टेक्नॉलॉजी या शाखेतील आहेत. कोल्हापूर जिल्हा माध्यमिक शिक्षणाधिकारी एकनाथ आंबोकर यांनाही शिक्षण विषयावर विद्यापीठाची पीएच.डी. मिळाली.

सकाळ




कोल्हापूर : डॉ. नितीन रणदिवे यांना त्यांचेच पुस्तक पुन्हा भेट देताना यशवंत बुक स्टॉलचे नेताजी कदम.

# वाचकाला आठ वर्षांनी परत मिळाली 'व्हॅलेंटाईन गिफ्ट'

## विद्यापीठातील ग्रंथमहोत्सवामधील घटना

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १८ : शिवाजी विद्यापीठाच्या ६० व्या दीक्षान्त समारंभाच्या निमित्ताने आयोजित केलेल्या तीन दिवसीय ग्रंथ महोत्सवाला वाचकांचा चांगला प्रतिसाद लाभला. त्यात एका वाचकाला त्याचेच पुस्तक आठ वर्षांनी परत मिळाल्याची दुर्मिळ घटनाही या महोत्सवात घडून आली. त्याला व्हॅलेंटाईन गिफ्ट मिळाली.

विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे सहाय्यक प्राध्यापक डॉ. नितीन रणदिवे हे ग्रंथ महोत्सवात खरेदीसाठी पुस्तकांची पाहणी करीत होते. येथील यशवंत बुक स्टॉलमध्ये दुर्मिळ आणि नामवंत लेखकांची पुस्तके ५० टक्के सवलतीत देण्यात येत आहेत. तेथे विविध पुस्तके चाळत असताना ज्येष्ठ विचारवंत आ. ह. साळुंखे यांचे 'सर्वोत्तम भूमिपुत्रः आक्षेप- डॉ. आंबेडकरांची विचारधारा आणि लेखकाची भूमिका' हे पुस्तक नजरेस पडले. ते त्यांनी कुतुहलाने हातात घेऊन चाळले असता त्यांना आश्चर्याचा धक्का बसला. त्याचे कारण असे की, त्यांच्या पत्नी विजया यांनी २०१५ च्या व्हॅलेंटाईन डे ला त्यांना हे पुस्तक भेट दिले होते. त्यावर त्यांनी नितीन यांचे नाव लिहून स्वाक्षरी केली होती. त्यांच्याकडून कोणी तरी हे पुस्तक वाचण्यासाठी म्हणून घेऊन गेले होते, मात्र, परत न करता रद्दीत घातले होते. तेच पुस्तक यशवंत बुक स्टॉलवर आठ वर्षांनी परत मिळाल्याचा आनंद डॉ. रणदिवे यांनी व्यक्त केला. मात्र, पुस्तक नेणाऱ्याच्या कृतीबद्दल त्यांना विशादही वाटला.

ही बाब समजताच यशवंत बुक स्टॉलच्या नेताजी कदम यांनी त्यांच्याकडून कोणतीही किंमत न आकारता ते त्यांना पुन्हा भेट दिले. अशा प्रकारे डॉ. रणदिवे यांना त्यांची व्हॅलेंटाईन गिफ्ट विद्यापीठाच्या ग्रंथमहोत्सवामुळे आठ वर्षांनी परत मिळाली.



शिवाजी विद्यापीठाचा दीक्षान्त समारंभ सोमवारी यंदाही केंद्रीय पद्धतीने पार पडला. विद्यापीठाच्या परीक्षा भवन क्रमांक दोनच्या प्रांगणात पदवी घेण्यासाठी विद्यार्थी-विद्यार्थिनींची परीक्षा विभागाच्या स्टॉलवर मोठी गर्दी झाली.

10 DEC 2023

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

पणदूरकर कुटुंबीयांची भावना : शिवाजी विद्यापीठास अभ्यासिकेसाठी ३५ लाख देणगी

# मुलींचे शिक्षण नित्य देत राहील रूपालीची आठवण

**विश्वास पाटील**
लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** आपल्या मुलीच्या वाट्याला कुणामुळे तरी दुर्दैवी आयुष्य आले; परंतु गोरगरिबांच्या मुली शिकल्या तर तीच आपल्या मुलीची खरी आठवण ठरेल या भावनेतून त्या मुलीचे आई-वडील गेली काही दिवस मुलींच्या शिक्षणासाठी प्रयत्नशील आहेत. शिवाजी विद्यापीठातील कमवा व शिका योजनेतून शिकणाऱ्या मुलींना अभ्यासिका बांधण्यासाठी त्यांनी तब्बल ३५ लाख रुपयांचा निधी देऊ केला आहे. ॲड. राम पणदूरकर आणि ॲड. हेमकिरण पणदूरकर असे त्यांचे नाव. ॲड. रूपाली पणदूरकर या मुलीच्या नावे ही अभ्यासिका होत आहे. शिवाजी विद्यापीठाचा आज हीरकमहोत्सवी दीक्षांत समारंभ होत आहे. पणदूरकर कुटुंबीयांसारख्या अनेकांच्या मदतीतून विद्यापीठाची वाटचाल समृद्ध झाली आहे.

## वेदनेतूनही सृजनाचा अंकूर फुलावा तो असा...



हल्लीच्या जगात खिशात कितीही पैसा असला तरी कुणी कुणासाठी ३५ रुपये काढून देत नाही; परंतु फक्त मुलीच्या आठवणीसाठी ३५ लाख रुपये विद्यापीठाला देऊ करण्यासाठीही मोठे काळीज असलेले आई-वडील असावे लागतात. पणदूरकर दांपत्याकडे ही दानत आहे. त्यांच्या मदतीतून अनेक मुलींचे शैक्षणिक भविष्य घडण्यास हातभार लागणार आहे. वेदनेतूनही सृजनाचा अंकूर फुलावा तो असा.

पणदूरकर कुटुंब मूळचे कोकणातील सावंतवाडीचे वकील घराणे म्हणून प्रसिद्ध. ॲड. सुभाष पणदूरकर हे प्रसिद्ध वकील. ॲड. राम पणदूरकर हे शिवाजी विद्यापीठाच्या भूगोलशास्त्र विभागाचे प्रमुख म्हणून निवृत्त झालेले. ते स्वतः एलएमएम. पत्नीही वकील. रूपाली त्यांची एकुलती मुलगी. तिने बॅचलर ऑफ सोशल लॉ केले. त्यानंतर एलएमएम, एलएलबी आणि पीएच.डी. केली. ॲड. संतोष शहा यांच्याकडे तिने महाराष्ट्रातील बालगुन्हेगारीचा सामाजिक अभ्यास केला. तिला सतार वादनाचीही आवड होती. सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायदीप या संशोधन पत्रिकेतही तिचे लेख प्रसिद्ध झालेले. तब्बल चौदा वर्षे तिने कोल्हापूरच्या दिवाणी न्यायालयात वकिली केली; परंतु वैवाहिक आयुष्यात आलेल्या वेदनादायी अनुभवानंतर तिने आयुष्य संपवले. पणदूरकर कुटुंबीयांना त्याचा मोठा मानसिक धक्का बसला; परंतु त्यातून ते सावरले व रूपालीसारख्याच अन्य मुलींचे उज्ज्वल भवितव्य घडविण्यासाठी प्रयत्न करायचा निर्धार त्यांनी केला. त्यानुसार गेली दहा वर्षे हे कुटुंबीय लेक लाडकी अभियानांतर्गत प्रत्येकी दहा हजार रुपयांची पोस्टात खाती काढून मदत करते. पुण्यातील महर्षी कर्वे संस्थेला त्यांनी मदत केली. आर्थिक अडचणीअभावी कुण्या मुलीचे शिक्षण थांबले असल्याचे त्यांना समजले तर ते मदतीसाठी धावतात. समाजातील मुलींमध्येच ते आता रूपालीचे आयुष्य शोधत आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 DEC 2023
सकाळ

# बालाजी हायस्कूलला यसबा करंडक

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १८ : येथील चित्रपट दिग्दर्शक यशवंत भालकर यांच्या पाचव्या स्मृतिदिननिमित्त झालेल्या आंतरशालेय कला महोत्सवांतर्गत यसबा करंडकावर इचलकरंजीच्या बालाजी हायस्कूलने आपले नाव कोरले. शिवाजी विद्यापीठ विद्यार्थी विकास विभाग, यशवंत भालकर फाउंडेशन यांच्यातर्फे महोत्सव झाला. एकवीस शाळांतील साडेपाचशेहून अधिक विद्यार्थ्यांचा महोत्सवात सहभाग होता.

मातीकाम, चित्रकला, निबंध, मूकनाट्य, एकपात्री, समूहगीत, समूहनृत्य आदी कलाप्रकारांत स्पर्धा रंगल्या. दीपक मिरजे, पी. जी, कुलकर्णी, रंगकर्मी केशव भागवत (बीड), बाळासाहेब कोडोलीकर यांच्या उपस्थितीत महोत्सवाचे उद्‌घाटन झाले. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरु प्रमोद पाटील, कुलसचिव विलास शिंदे यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. रंगकर्मी प्रशांत जोशी यांना यसबा बालमित्र पुरस्काराने सन्मानित केले. शिवाजी विद्यापीठाचे अधिष्ठाता एम. एस. देशमुख, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक पी. टी. गायकवाड यांचे हस्ते पुरस्कार वितरण झाले. परीक्षक म्हणून उमेश नेरकर, विनोद ठाकूरदेसाई, मकरंद लिंगनूरकर, सुनील घोरपडे, चित्रकार बबन माने , मनीपद्म हर्षवर्धन, स्वप्नील भोसले , गौरी चिले, भाग्यश्री कालेकर, बाळासो नागवडे (पुणे) यांनी काम पाहिले. विश्वराज जोशी, अनुराधा गुळवणी, पद्मजा पाटील यांनी निवेदन केले. भविष्यात हा उपक्रम आणखी व्यापक करणार असल्याचे संयोजक संग्राम भालकर यांनी सांगितले.



कोल्हापूर : येथे यसबा करंडकाचे विजेते पारितोषिक स्वीकारताना बालाजी हायस्कूलचे विद्यार्थी व विद्यार्थिनी.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

19 DEC 2023
लोकमत

# शोधगंगावर पाच लाख पीएच.डी. प्रबंध

## सावित्रीबाई फुले, शिवाजी विद्यापीठ प्रबंध देण्यात आघाडीवर

रेश्मा शिवडेकर
लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** विद्यापीठे आणि शिक्षण संस्थांच्या ग्रंथालयात धूळखात पडून असलेला एम.फील व पीएच.डी.चा प्रबंधरूपी (थिसिस) संशोधनाचा ठेवा जगभरातील संशोधकांना अभ्यासासाठी उपलब्ध व्हावा यासाठी सुरू केलेल्या 'शोधगंगा' या संकेतस्थळावर आतापर्यंत पाच लाखांहून अधिक प्रबंध उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

**आघाडीवरील १० विद्यापीठे**

| | |
|---|---|
| अण्णा, चेन्नई | १५,४६६ |
| मद्रास | १४,६६८ |
| कोलकाता | १४,०९८ |
| सावित्रीबाई फुले पुणे | १२,४०४ |
| छत्रपती शाहू महाराज | १०,१५२ |
| अलिगढ मुस्लिम | ९,८८१ |
| बाबासाहेब आंबेडकर बिहार | ९,६७५ |
| आंध्र | ९,५५१ |
| पंजाब | ८,९११ |
| पूर्वांचल | ८,९०३ |

महाराष्ट्रात पुणे विद्यापीठातून सर्वाधिक म्हणजे १२ हजार ४०४ प्रबंध उपलब्ध झाले आहेत. कोल्हापूर विद्यापीठही सर्वाधिक प्रबंध उपलब्ध करून देणाऱ्या पहिल्या १० विद्यापीठांच्या यादीत आहे. मुंबई विद्यापीठाने १९३० पासूनचे सात हजारांच्या आसपास प्रबंध उपलब्ध करून दिले आहेत. केंद्र सरकारच्या शिक्षण मंत्रालयाच्या पुढाकाराने 'शोधगंगा' उपक्रम देशभरातील जवळपास ७५० विद्यापीठांच्या मदतीने राबविण्यात येत आहे. मात्र, विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) याबाबत सूचना दिल्यानंतरही विद्यापीठांनी प्रबंध उपलब्ध करून देण्याबाबत फारशी उत्सुकता दाखविली नव्हती. देशातील सर्वाधिक तीन जुन्या विद्यापीठांपैकी एक असलेल्या मुंबई विद्यापीठाने दोन वर्षांपूर्वी, तर अवघे ५०० प्रबंध ऑनलाईन उपलब्ध करून दिले होते. परंतु, 'आता या कामाने चांगलाच जोर पकडला आहे. विद्यापीठाने सुमारे सात हजारांच्या आसपास प्रबंध अपलोड केले आहेत,' अशी माहिती विद्यापीठाच्या ज्ञान स्रोत केंद्राचे संचालक डॉ. नंदकिशोर मोतेवार यांनी 'लोकमत'ला दिली. आणखी अजून तितक्याच संख्येने प्रबंध आहेत, असे त्यांनी सांगितले.

लोकमत

# न्यू कॉलेजमध्ये गुरुवारपासून परिषद


कोल्हापूर : न्यू कॉलेजमधील रसायनशास्त्र विभाग व सोळांकूर येथील यशवंतराव पाटील सायन्स कॉलेजतर्फे २१ ते २३ डिसेंबर या कालावधीत न्यू कॉलेजमध्ये नॅनो मटेरियल फॉर एनर्जी अँण्ड एन्व्हायर्नमेंट या विषयावर ६ व्या आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन केले आहे.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊसचे अध्यक्ष के. जी. पाटील यांच्या उपस्थितीत या परिषदेचे उद्घाटन होईल. या परिषदेत मुंबईतील डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. आर. के. कामत हे बीजभाषक म्हणून मार्गदर्शन करणार आहेत. देशातील विविध राज्यांसह कोरिया, नेपाळ, तैवान या देशांमधील १०० प्रमुख संशोधक, विद्यार्थी या परिषदेत पेपर सादर करणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 DEC
पुढारी

# शिवाजी विद्यापीठ आंतर विभागीय फुटबॉल स्पर्धेत शहाजी कॉलेज विजेता

कोल्हापूर : दौलतराव आहेर कॉलेज, कराड येथे झालेल्या शिवाजी विद्यापीठ आंतर विभागीय फुटबॉल स्पर्धेत शहाजी छत्रपती महाविद्यालय विजेता ठरला. पेनल्टी शूटआऊटवर कर्णधार प्रथमेश हेरेकर यांनी गोल रोखून विजेतपद मिळविले. तत्पूर्वी झालेल्या उपांत्य सामन्यात एल. बी. एस. कॉलेज साताराला चार विरुद्ध शून्य गोलने हरवून अंतिम सामन्यात प्रवेश केला. शहाजी कॉलेजच्या प्रभू पवार, स्वयम साळोखे, रोहित पवार, शोएब बागवान, यश कांबळे, सिद्धार्थ पाटील, प्रथम भोसले व संकेत कांबळे यांनी चमकदार कामगिरी केली. विजेत्या संघाला संस्थेचे चेअरमन मानसिंग बोंद्रे, प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण, जिमखाना प्रमुख डॉ. प्रशांत पाटील व प्रशिक्षक विश्वास मालेकर-कांबळे यांचे मार्गदर्शन लाभले.



जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 DEC
पुढारी

# पवन पाटील, गजानन शिंगाडी यांची विद्यापीठ व्हॉलीबॉल संघात निवड

हमिदवाडा : अर्जुननगर (ता. कागल) येथील देवचंद महाविद्यालयाचे





पवन पाटील   गजानन शिंगाडी

व्हॉलीबॉल खेळाडू पवन पाटील व गजानन शिंगाडी यांची शिवाजी विद्यापीठ संघातून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे होणाऱ्या पश्चिम विभागीय व्हॉलीबॉल स्पर्धेसाठी निवड झाली आहे. विजयी खेळाडूंना जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष आशिष शाह, उपाध्यक्षा डॉ. तृप्ती शाह, खजिनदार सुबोध शाह यांचे प्रोत्साहन लाभले. प्राचार्य डॉ. सौ. जी. डी. इंगळे, उपप्राचार्य डॉ. पी. पी. शाह, जिमखानाप्रमुख डॉ. रवींद्र चव्हाण, प्रा. निरंजन, डॉ. भालचंद्र आजरेकर यांचे मार्गदर्शन लाभले.